## दुसरे गिरीमित्र संमेलन : १ जून २००३

पहिल्या संमेलनाच्या यशस्वी सांगतेतच दुस-या संमेलनाचे बीज दडलेले होते. संमेलन हा फक्त एखाद्या वर्षी होणारा कार्यक्रम नसून तो दरवर्षी सातत्याने होणार असल्याची जाणीव संमेलनास हजर राहिलेल्या प्रत्येकालाच झाली होती. पहिले संमेलन अनेक संस्थांच्या सदस्यांचा हातभार लावून संपन्न झाले असले तरी दुस-या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी Pinnacle Club या संस्थेने स्वीकारली होती.

संमेलनासाठी 'गिर्यारोहणातून अभ्यास' हे मध्यवर्ती सूत्र निवडण्यात आले होते. गिर्यारोहणातील विविध पैलूंची माहिती होण्यासाठी व त्यातून नव्या मोहिमांसाठी नवा दृष्टीकोन मिळण्यासाठी अभ्यासही करणे गरजेचे आहे, यासंबंधीचे मार्गदर्शन या संमेलनात करण्यात आले. या संमेलनाला श्री सतीश मराठे, अध्यक्ष युनायटेड वेस्टर्न बँक, सातारा हे उदघाटक म्हणून लाभले होते.

महाराष्ट्रातील बहुसंख्य गिर्यारोहकांची गिरीभ्रमणाची सुरुवात सह्याद्रितील किल्ले चढण्यापासूनच होते. पण ते नुसतेच किल्ले चढून निसर्गसौंदर्य न पाहता, ते कसे बांधले आहेत याचाही अभ्यास केला तर त्या चढाईचा आनंद द्विगुणीत कसा होईल यावर श्री भालचंद्र कुलकर्णी, उपसंचालक – पुरातत्व विभाग यांनी मार्गदर्शन केले. अगदी मुंबईच्या किल्ल्यांपासून सुरुवात करून इतर गिरिदुर्गांच्या वैशिष्ट्यांचे विवेचन करीत अभ्यासपूर्ण असे व्याख्यान याप्रसंगी त्यांनी केले. संमेलनातील इतर कार्यक्रमात क्रीडा खात्याचे उपसंचालक श्री. एन. यु. श्रोते यांनी गिर्यारोहण संस्था शासकीय अनुदान कसे मिळवू शकतात व त्याचा विनियोग कसा करू शकतात, याबाबत मार्गदर्शन केले. बहुसंख्य गिर्यारोहण संस्थांना याबाबतीत अडचणी येत असल्यामुळे त्यांचे भाषण खूपच उपयुक्त ठरले.

'हिमालयन क्लब'च्या श्री. दिव्येश मुनी यांनी हिमालयातील मोहिमा कशा आखाव्यात, त्याची पूर्व तयारी करताना कोणत्या गोष्टी ध्यानात ठेवाव्यात या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले. हिमालयातील मोहिमेच्या यशामागे पूर्वतयारी किती महत्वाची असते हे त्यांनी पटवून दिले. गिर्यारोहकांना अतिशय जवळचा असणारा विषय म्हणजे - पर्यावरण. म्हणूनच पर्यावरण तज्ञ श्री. मिलिंद आमडेकर यांनी गिर्यारोहणातील पर्यावरणाचे महत्व विषद केले. सौ. विनिता मुनी यांनी नुकत्याच यशस्वीपणे पूर्ण केलेल्या आणि फक्त महिलांचाच सहभाग असलेल्या 'ट्रान्स हिमालयन ट्रेक' चे सुंदर सादरीकरण केले. यावेळी महाराष्ट्र सेवा संघाच्या न. चि. केळकर ग्रंथालयातर्फे गिर्यारोहण व संबधित विषयावरील मराठी व इंग्रजी पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

Pinnacle Club च्या श्री. समीर परांजपे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित झालेल्या या संमेलनात मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरुन सादर केलेल्या विविध कार्यक्रमांमुळे या संमेलनातून त्या संकल्पनेला व गिर्यारोहणाला एक दिशा मिळाली.

****************